## महत्त्वाचे

### विमा सुरक्षा काळाची गरज : बिपीन कोल्हे



**कोपरगाव (प्रतिनिधी)–** आपत्ती ही कधीही सांगुन येत नाही, बदलत्या जीवनशैलीमुळे मानवाच्या आजारात वाढ होत आहे. त्यासाठी विमा ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी केले. येथील सहकाररत्न शंकरराव कोल्हे शेतकरी सहकारी संघाचे उपाध्यक्ष बाजीराव मांजरे हे किडनीच्या विकाराने आजारी होते. त्यांना निवा बुपा इंशुरन्स कंपनीच्यावतीने ७७ हजार रूपयांचा विमा धनादेश शनिवारी कारखाना कार्यस्थळावर प्रदान करण्यांत आला त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्ष अंबादास देवकर, संचालक प्रकाश सांगळे, रामदास शिंदे, कोल्हे कारखान्याचे साखर सरव्यवस्थापक शिवाजीराव दिवटे उपस्थित होते. भिवराज जावळे यांनी त्यांच्या मेडीक्लेमच्या कागदपत्रांची पुतर्ता करून याकामी विशेष सहकार्य केले. बिपीन कोल्हे म्हणाले, सध्याचे युग हे स्पर्धेचे आहे. त्यात प्रत्येक बाबींवर अनेकांनी नागरिकांना परवडतील अशा स्वरूपात असंख्य विमा योजना आणल्या आहेत, हे विमे आपत्तीच्या काळात उपयोगी पडतात.

### जनता इंग्लिश स्कुल संवत्सर विद्यालयात वृक्षदिंडी




**कोपरगाव (प्रतिनिधी)–** जनता इंग्लिश स्कूल संवतसर विद्यालयात वृक्षदिंडी व ग्रंथदिंडी हरित सेनेमार्फत आयोजन करण्यात आली. याप्रसंगी संवत्सर गावाचे भजनी मंडळ ताल मृदुंगाच्या स्वरात व ५ वी ते १० वी अखेर सर्व विद्यार्थ्यांना गावात वृक्षांची रॅली काढण्यात आली होती. वृक्ष दिंडीमध्ये बाबासाहेब खर्डे, निवृत्ती महाराज दैणे, बाळासाहेब सोनवणे, प्रभाकर कर्पे, भीमा गायकवाड, मृदंगाचार्य सुभाष बिडवे, पन्नालाल नेहे, प्रभाकर आबक, मुख्याध्यापक रमेश मोरे, चंद्रशेखर दवंगे, बाळू गायकवाड सहभागी झाले होते. वृक्षदिंडी मध्ये विविध प्रकारची वृक्ष तसेच घोषवाक्य, घोषणाफलक झाडे लावा झाडे जगवा इ घोषणेने दिंडीची सुरवात करण्यात आली. सुत्रसंचलन सुनिल वाघमारे यांनी केले. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्त हजर होते. शाळा व्यवस्थापक समिती सदस्य चंद्रकांत लोखंडे, सरपंच विवेक परजणे, भाऊसाहेब परजणे उपस्थित होते. माजी विद्यार्थी, मुख्याध्यापक रमेश मोरे यांनी विद्यार्थ्यांना वृक्षाचे महत्व पटवून दिले. एक मुल एक झाड ही संकल्पना विद्यार्थ्यांना सांगण्यात आली. उपस्थित मान्यवरांचे हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात वृक्षरोपण करण्यात आले. आभार भगवान शिंदे यांनी मानले.

### संगमनेरात आजपासून भगवा सप्ताहास सुरुवात होणार

**संगमनेर (प्रतिनिधी) –** संपूर्ण राज्यात भगवा सप्ताह आयोजित करण्यात आला असून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे निवडणूक चिन्ह मशाल व पक्षाची विचारधारा नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी रविवारी (दि. ११ ऑगस्ट) दुपारी ३ वाजता संगमनेर बसस्थानक येथे जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे, संपर्क प्रमुख सूर्यकांत शिंदे यांचे हस्ते सप्ताहाचा शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती संगमनेर तालुकाप्रमुख संजय फड व शहरप्रमुख अप्पा केसेकर यांनी दिली. सदर यात्रा ११ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट अशी २० दिवस चालणार आहे. या यात्रेस महिला आघाडी जिल्हाप्रमुख सपना मोरे, संगमनेर महिला आघाडी संर्पक प्रमुख बेबी लांडगे, जिल्हा समन्वयक दिलीप साळगट, उपशहरप्रमुख अशोक सा-तपुते, संघटक कैलास वाकचोरे, युवासेना तालुकाप्रमुख अक्षय गुंजाळ, महिला आघाडीच्या शीतल हासे, युवासेना शहरप्रमुख अमित चव्हाण, गोविंद नागरे, संघटक गुलाब भोसले यांसह शिवसैनिक उपस्थित राहणार आहेत. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांना आदर्श मानून शिव-सेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने या भगव्या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे फड यांनी सांगितले.

### आमदार थोरातांच्या मागणीवरुन निळवंडेतून पाणी सुटले

**संगमनेर (प्रतिनिधी) –** आमदार बाळासाहेब थोरात यांनी निळवंडे धरण ओव्हरफ्लो झाल्याने डाव्या व उजव्या कालव्यांतून तातडीने पाणी सोडाव अशी मागणी सरकारकडे केली होती. त्यानुसार शनिवारी (दि. १० ऑगस्ट) कालव्यांमधून पाणी सुटल्याने जिरायत भागातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आमदार बाळासाहेब थोरात यांनी सातत्याने पाठपुरावा करून निळवंडे प्रकल्प व कालव्यांची कामे मार्गी लावली. मागील आठवड्यामध्ये धरणाच्या पाणलोटक्षेत्रात चांगला पाऊस झाल्याने भंडारदरा व निळवंडे धरण पूर्ण भरले. मात्र संगमनेरसह उत्तर नगर जिल्ह्यात अत्यंत कमी पाऊस झाला. पावसाळ्यातही अनेक ठिकाणी पाणीटंचाई आहे. तळेगाव भागात दुष्काळी परिस्थिती आहे. त्यामुळे आमदार थोरात यांनी जिरायत भागाला दिलासा देण्याकरीता तातडीने दोन्ही कालव्यांमधून पाणी सोडावे अशी मागणी केली. याचबरोबर सर्व पाझर तलाव, केटीवेअर व बंधारे भरून द्यावे अशी मागणी शासनाकडे केली. त्याची दखल घेऊन दोन्ही कालव्यांतून पाणी सुटल्याने जिरायत भागातील व लाभक्षेत्रातील १८२ गावांमधील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# निळवंडेचे पाणी शेवटच्या शेतकऱ्याला मिळेल असे नियोजन करा

## ■ महसूलमंत्री विखे पाटील; पूजन करुन कालव्यांतून सोडले पाणी

**अकोले (प्रतिनिधी) –** निळवंडे धरणातून शनिवारी (दि. १० ऑगस्ट) उच्चस्तरीय कालव्यांसह डाव्या आणि उजव्या कालव्यांचे पूजन करुन पाणी सोडण्यात आले. ओव्हरफ्लोच्या पाण्याचा लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना प्रथमच लाभ होत आहे, ही अतिशय समाधानाची बाब आहे. लाभक्षेत्रातील शेवटच्या शेतकऱ्याला पाणी मिळेल असे नियोजन करण्याच्या सूचना महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

निळवंडे धरण स्थळावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत जलपूजन करण्यात आले. यावेळी माजी आमदार वैभव पिचड, अगस्ति कारखान्याचे अध्यक्ष सीताराम गायकर, भाजप तालुकाध्यक्ष यशवंत आभाळे, अगस्ति कारखान्याचे माजी संचालक राजेंद्र डावरे, अमृतसागर दूध संघाचे संचालक जगन देशमुख, अगस्ति पतसंस्थेचे अध्यक्ष अश-ोक देशमुख, संगमनेर तालुका संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष अमोल खताळ यांच्यासह जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता बाळासाहेब शेटे, उपअभियंता श्री. चोपडे, अभिजीत देशमुख आणि लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

मागील आठवड्यात धरणाच्या पाणलोटक्षेत्रामध्ये पावसाने चांगली हजेरी लावल्याने निळवंडे धरणातून ओव्हरफ्लोचे पाणी सोडण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला होता. ओव्हरफ्लोचे पाणी कालव्यांना सोडावे अशा सूचना पालकमंत्री विखे पाटील यांनी दिल्या होत्या. शुक्रवारी संगमनेर येथील कार्यक्रमामध्ये कालव्यांना शनिवारीच पाणी सोडण्याची ग्वाही ना. विखे पाटील यांनी दिली होती. त्याप्रमाणे धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून पाणी सोडण्यात आले असून, उच्चस्तरीय कालव्यातूनही पाणी सोडण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.



यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाचे लोकार्पण झाले. पाण्याची चाचणी घेण्यात आली. आज धरणातून कालव्यांमध्ये पाणी सोडण्याचा हा आनंददायी क्षण आहे. ओव्हरफ्लोचे पाणी प्रथमच सोडण्यात येत असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले. निळवंडे प्रकल्पाचा एकत्रित आढावाही त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतला. शेतकऱ्यांना पाणी मिळेल यासाठी सर्व उपाययोजना सुरु करण्याचे निर्देश त्यांनी दिले असून, बंदिस्त नलिका वितरण प्रणालीच्या कामासाठी जलसंपदा विभागाने निविदा काढली असून, संपूर्ण लाभक्षेत्रासाठी बंदिस्त नलिका वितरण प्रणालीतून पाणी देण्याचा निर्णय झाला असल्याचे विभागाच्यावतीने सांगण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना शाश्वत पाणी पुरवठा होवू शकेल.

## मुळा डाव्या कालव्याला पाणी सोडण्याची शेतकऱ्यांची मागणी

**राहरी (तालुका प्रतिनिधी)–** ,मुळा डाव्या कालव्याला त्वरित पाणी सोडून राहुरी तालुक्यातील पिकांना जीवदान देण्याची मागणी मुळा डाव्या कालव्याखालील जोगेश्वरी आखाडा, काळे आखाडा, येवले आखाडा, वाघाचा आखाडा, टाकळीमिया, मुसळवाडी येथील लाभधारक शेतकऱ्यांनी केली आहे.

शेतकऱ्यांनी म्हटले, मुळा डाव्या कालव्याचे आवर्तन होऊन जवळपास चार महिने उलटले आहेत. उन्हाळ्यातही आपल्या हक्काचे पाणी डाव्या खालील शेतकऱ्यांना मिळाले नाही. यातूनच अपुरे पाणी असतानाही थोड्याफार झालेल्या पावसावर व उपलब्ध पाण्यावर शेतकऱ्यांनी कपाशी, तुर, मका, सोयाबीन, आदी पिकांच्या लागवडी केल्या आहे. परंतु, गेल्या दोन महिन्यापासून लाभक्षेत्रात किरकोळ भूर भूर पाऊस वगळता मोठा पाऊस झालेला नाही. विहिरी व बोअरवेल पूर्णपणे कोरडे पडले आहे. शेतकऱ्यांनी आजपर्यंत उपलब्ध पाण्यावर मोठ्या मेहनतीने खते, खुरपणी, अधिक खर्च करून पिके जगवली आहेत. परंतु आता मात्र ही पिके सुकू लागली आहे. मुळा धरणात बऱ्यापैकी पाण्याची आवक असल्याने डाव्या कालव्याला त्वरित पाणी सोडून ही पिके वाचतील. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या विहीरी व बोअरवेलला थोडेफार पाणी पातळी वाढून जीवदान मिळेल. यासाठी पाटबंधारे खात्याने त्वरित निर्णय घेऊन परिसरातील शेतकऱ्यांची गरज ओळखून डाव्या कालव्यास पाणी सोडावे, अशी मागणी दिलीप उंडे, राजेंद्र काळे, गोरख निमसे, दगडू भोंगळ, शिवाजीराव डौले, विजय डौले, प्रकाश भुजाडी, बाळासाहेब जाधव, शहाजी ठाकूर, अशोक वामन, मंदार धुमाळ आदींसह शेतकऱ्यांनी केली आहे

## जिल्हा बँक राहाता शाखेवरील गणेशचे आंदोलन तात्पुरते स्थगित

### ■ गणेशचे अध्यक्ष लहारे व उपाध्यक्ष दंडवते यांची माहिती

**राहाता (तालुका प्रतिनिधी)–** राजकिय आकसापोटी कर्ज नाकारले जात असल्याच्या भावनेतुन श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याच्या सभासद, शेतकरी व कामगारांचे जिल्हा बँकेच्या विरोधातील सोमवार दि. १२ ऑगस्ट रोजी आयोजित केलेले आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे, अशी माहिती गणेश कारखान्याचे अध्यक्ष सुधीर लहारे व उपाध्यक्ष विजय दंडवते यांनी दिली.

श्रीगणेश सहकारी साखर कारखान्याने सन २०२४-२५ या हंगामाकरिता कर्ज मागणीचा प्रस्ताव जिल्हा सहकारी बँकेकडे पाठविला होता. हा प्रस्ताव जिल्हा बँकेने राजकीय आकसापोटी नाकारला. त्यामुळे मागील हंगामातही ४० कोटी रुपये कर्ज मंजुर केले होते, ते मात्र शेवटच्या क्षणी नाकारले होत. याही वेळी कारखान्याने प्रस्ताव दाखल केला. तो नाकारला. त्यामुळे गणेश कारखान्याचे सभासद, शेतकरी व कामगार आक्रमक झाले होते. येत्या सोमवारी जिल्हा बँकेच्या राहाता शाखेवर निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

दरम्यान गणेशच्या सभासद, शेतकऱ्यांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर जिल्हा सहकारी बँकेने सकारात्मक प्रतिसाद दिला. येत्या २० ऑगस्ट रोजी जिल्हा बँकेच्या संचालक मंडळाची मिटींग आयोजित करण्यात आली आहे. त्या मिटींगमध्ये विषय पत्रिकेत गणेश कारखान्याच्या कर्जाबाबत विषय ठेवण्यात आला आहे. तसे बँकेने कळविल्याने तुर्तास १२ ऑगस्ट चे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. मात्र २० ऑगस्ट च्या जिल्हा बँकेच्या बैठकीत गणेश कारखान्याच्या कर्जाबाबत सकारात्मक निर्णय न झाल्यास व कर्ज वितरीत न केल्यास, फसवणूक झाल्यास २७ ऑगस्ट २०२४ रोजी पुन्हा जिल्हा बँकेच्या राहाता शाखेवर निषेध मोर्चाचे आयोजन केले जाईल, असा इशारा श्री. लहारे व श्री. दंडवते यांनी दिला आहे.

दरम्यान काल या संदर्भात गणेशनगर येथे संचालक मंडळातील सदस्य व काही सभासद, शेतकरी यांची या संदर्भात बैठक झाली. त्यात बँकेने गणेश च्या कर्जाबाबत सकारात्मक कार्यवाही न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

# विद्यापीठ कमी मनुष्यबळातही शेतकऱ्यांसाठी कार्यक्षमपणे कार्यरत-डॉ.पाटील

## ■ महात्मा फुले कृषि विद्यापीठात खरीप हंगामासाठीची विभागीय बैठक

**राहुरी (तालुका प्रतिनिधी)–** राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाने यावर्षी ६ वाण, ८९ कृषि तंत्रज्ञान शिफारशी व ४ सुधारित अवजारे प्रसारित केली आहे. विद्यापीठातील संशोधन कृषि विज्ञान केंद्रे, विविध विस्तार केंद्रे व कृषि विभागाच्या मदतीने शेतकऱ्यांपर्यंत पोहचविले जाते. विद्यापीठ व कृषि विभाग कमी मनुष्यबळातही शेतकऱ्यांसाठी कार्यक्षमपणे कार्यरत असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठात विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती खरीप-२०२४ च्या बैठकीचे आयोजन हायब्रीड मोडमध्ये करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरुन महात्मा फुले कृषिविद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी डॉ. दिलीप पवार, विठ्ठल शिर्के, डॉ. गोरक्ष ससाणे, रफिक नाईकवडी, उमेश पाटील, रविशंकर चलवदे, डॉ. साताप्पा खडबडे व डॉ. विजय शेलार उपस्थित होते.



कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले, यावर्षी विद्यापीठाने विविध पिकांचे १८४६ क्विंटल बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करुन दिले. सरकारने दिलेले बिजोत्पादनाचे लक्षांक विद्यापीठाने पुर्ण केले आहे. कृषि विभागानेसुध्दा बिजप्रक्रियेसारख्या योजना चांगल्या पध्दतीने राबविलेल्या आहेत. शेतकऱ्यांना शेती करतांना येणाऱ्या अडचणी, विविध प्रश्न यावरुनही संशोधनाची दिशा ठरविता येते असे त्यांनी सांगीतले.

यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी संशोधन अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. गोरक्ष ससाणे यांनी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण उपक्रमांचे सादरीकरण केले. डॉ. मुकुंद शिंदे यांनी सौर उर्जा संचलीत सिंचन प्रणाली या विषयावर सादरीकरण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सुगी, खरीप व इतर प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे, कोल्हापूर व नाशिक कृषि विभागांचे कृषि सह-संचालक रफिक नाईकवाडी, संभाजी ठाकुर, कुंभार यांनी त्यांच्या विभागांचा अहवाल सादर केला. बैठकीदरम्यान डॉ. साताप्पा खरबडे यांनी फळमाशी व वांझ रोगावरील औषधे, डॉ. सचिन नलावडे यांनी ड्रोनद्वारे फवारणी करण्याचे मानके, डॉ. विजू अमोलिक यांनी केळी व नाचणी पिकाविषयीचे प्रश्न, डॉ. बी.टी. पाटील यांनी केळी, ड्रॅगन फ्रुट, सफरचंद, स्ट्रॉबेरी व प्लॅस्टिक आच्छादन याविषयी, डॉ. विक्रम कड यांनी कांदा डिहायड्रेशन, हिरवी मिरची, नाचणी पिकांविषयीचे प्रश्न, डॉ. अशोक पिसाळ यांनी ऊस पिकाविषयीचे प्रश्न, डॉ. अनिल दुरगुडे यांनी सूक्ष्मअन्नद्रव्यांविषयी डॉ. नरेंद्र काशीद भात पिकानंतर घ्यावयाची पिके, डॉ. तुळशीदास बास्टेवाड कृषि अवजारांविषयी, डॉ. सुनील कराड यांनी मका पिकाविषयी, डॉ. दिलीप देवकर जनावरांच्या खाद्याविषयी, डॉ. योगेश बन यांनी नाचणी पिकाविषयी, डॉ. कैलास भोईटे यांनी सुपरकेन नर्सरीविषयी, डॉ. नंदकुमार भुते यांनी कपाशीवरील बुरशीनाशकांची माहिती या विषयांवर मार्गदर्शन केले.

स्वागत व प्रास्ताविक डॉ. विजय शेलार यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. बैठकीस विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता, कृषि सह-संचालक, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सर्व विभाग प्रमुख, उप-विभागीय कृषि अधिकारी, विद्यापीठ शास्त्रज्ञ व कृषि विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## महसूल विभागात सामान्य माणसाच्या हिताचे निर्णय-सौ.विखे

**राहाता (प्रतिनिधी)–** महसूल पंधरवड्याच्या माध्यमातून शासनाच्या योजना सामान्य माणसापर्यंत पोहोचण्यास मोठी मदत होत आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने सामान्य माणसाच्या हिताचे निर्णय केले. महायुती सरकारही लोकाभिमुख निर्णय घेत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.शालिनीताई विखे पाटील यांनी केले.

महसूल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या महसूल पंधरवडा उपक्रमाचे उद्घाटन शालिनीताई विखे पाटील यांच्या उपस्थितीत लोणी खुर्द येथे संपन्न झाले. याप्रसंगी तलाठी वैष्णवी वाघ, पुनम संजय वैष्णव या नवनिर्वाचित तलाठ्यांचा सत्कार सौ. विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.



महसूल पंधरवड्याच्या निमित्ताने शासनाच्या सर्व यंत्रणेचा लोकांशी थेट संपर्क होणार आहे. मागील वर्षी सप्ताहाला मिळालेला प्रतिसाद पाहता मंत्री विखे पाटील यांनी हा उपक्रम आता पुढील १५ दिवस राज्यातील सर्व भागांमध्ये राबविण्याचा निर्णय घेतला. या उपक्रमातून शासनाच्या सर्व योजनांची माहिती लोकांपर्यंत जाण्यास मोठी मदत होणार असल्याचे सौ. विखे पाटील म्हणाल्या.

मागील अडीच वर्षात महायुती सरकारने महत्वपूर्ण निर्णय घेतले. यामध्ये महसूल विभागाचे निर्णय हे लोकांच्या हिताचे राहीले आहेत. या विभागाचा चेहरा मोहरा बदलण्याचे मोठे काम मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून होत आहे. यापुर्वी सुध्दा शासन आपल्या दारी या उपक्रमाने नगर जिल्ह्यातील सर्वाधिक लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळाला. महसूलच्या सर्व उपक्रमांमुळे या विभागाचे वेगळेपण सिध्द झाले आहे. सामान्य माणसाला न्याय देण्याची भूमिका लक्षात घेवूनच महसूल विभागाची निर्णय प्रक्रिया होत असल्याचे सौ. विखे पाटील म्हणाल्या.

## पुणतांब्यात रेल्वे रोको आंदोलनाची जय्यत तयारी

**पुणतांबा (वार्ताहर) –** पुणतांबा रेल्वे जंक्शन या रेल्वे स्थानकावर सर्वच गाड्यांना थांबा मिळावा या मागणीसाठी पुणतांबेकरांनी येत्या १५ ऑगष्ट स्वांतत्र दिनाच्या दिवशी रेल्वे रोको आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे. रेल्वे रोको आंदोलनासाठी रेल्वेच्या अधिकाऱ्यांना ग्रामस्थानी रितसर लेखी निवेदन दिले आहे. त्यामुळे आता कोणत्याही परिस्थितीत हे आंदोलन होणारच आहे. शेतकरी संपासारखे अनोखे आंदोलन करणाऱ्या पुणतांबेकरांनी रेल्वे रोको आंदोलन यशस्वी करण्यासाठी कंबर कसली आहे.

जवळच्या गांवामध्ये जाऊन बैठका घेण्यात येत आहे. पंचक्रोशीतील गावामधूनही जास्तीत जास्त लोक आंदोलनात कसे सहभागी होतील यासाठी जोरदार प्रयत्न सुरू असून त्याला चांगला प्रतिसाद मिळत आहे. समाज माध्यमामार्फत आंदोलनाबाबत चांगली जनजागृती निर्माण झालेली आहे. पुणतांबा येथे सर्व गाड्यांना थांबा मिळविणे किती गरजेचे आहे याबाबतचा योग्य संदेश ग्रामस्थ, विद्यार्थी, व्यापारी यांच्यापर्यंत पोहचविण्यात आंदोलनकर्ते यशस्वी झाले आहे. त्यामुळे आंदोलन राज्याचे नव्हे तर देशाचे लक्ष वेधून घेण्याची शक्यता आहे. आंदोलनाच्या माध्यमातून पुणतांबेकर मागण्या मान्य करून घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आंदोलनाला रेल्वेचे कोणते वरिष्ठ अधिकारी येतात तसेच कोणते लोकप्रतिनिधी सहभागी होतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.